दिनांक 28/05/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 15

विषय – स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत विटा शहरामध्ये टाकाऊ वस्तुपासून कलात्मक वस्तू तयार करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरिक्षक यांची दिनांक 19/05/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत विटा शहरामध्ये टाकाऊ वस्तुपासून कलात्मक वस्तू तयार करणेकामी खालील निविदा दाखल आहेत

1) अनंत एन्टरप्रायजेस
2) दिव्यस्वप्न फाऊंडेशन
3) आय स्मार्ट टेक्नो सोल्युशन्स

उपरोक्त निविदापैकी अनंत एन्टरप्रायजेस यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 28/05/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 16

विषय – विटा शहरातील भटक्या कुत्र्यांचे Dog Control Programme चे नियोजन करणे, व्यवस्थापन करणे, भटक्या कुत्र्यांना पकडणे, वाहतूक करणे, नसबंदी शस्त्रक्रिया करणे, लसीकरण करणे व औषधोपचार करुन कुत्र्यांना सोडून देणे तसेच तद्अनुषंगिक कामे करणेबाबत दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी स्वच्छता निरिक्षक यांची दिनांक 19/05/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा शहरातील भटक्या कुत्र्यांचे Dog Control Programme चे नियोजन करणे, व्यवस्थापन करणे, भटक्या कुत्र्यांना पकडणे, वाहतूक करणे, नसबंदी शस्त्रक्रिया करणे, लसीकरण करणे व औषधोपचार करुन कुत्र्यांना सोडून देणे तसेच तद्अनुषंगिक कामे करणेबाबत खालील निविदा दाखल आहेत

1) आदर्श कामधेनू संशोधन संस्था, सोलापूर
2) पिपल फॉर ॲनिमल्स, सांगली
3)श्रमसाफल्य बहुउदेशीय संस्था, सोलापूर

उपरोक्त निविदापैकी आदर्श कामधेनू संशोधन संस्था, सोलापूर यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 28/05/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 17

विषय – विटा नगरपरिषद मालकीच्या शाळांचे वॉटफ्रुपींग करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 21/05/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद मालकीच्या शाळांचे वॉटफ्रुपींग करणे गरजेचे आहे. ती कामे खालीलप्रमाणे.

1. विटा नगरपरिषद मालकीची शाळा क्र. 4 व शाळा क्र. 11 शाळेचे स्लॅबवरील कोबा वॉटरफ्रुपींग करणे.
2. विटा नगरपरिषद मालकीची शाळा क्र. 14 व शाळा क्र. 16 शाळेचे स्लॅबवरील कोबा वॉटरफ्रुपींग करणे.
3. विटा नगरपरिषद मालकीची शाळा क्र. 7 शाळेचे स्लॅबवरील कोबा वॉटरफ्रुपींग करणे.
4. विटा नगरपरिषद मालकीची शाळा क्र. 9 शाळेचे स्लॅबवरील कोबा वॉटरफ्रुपींग करणे.

तरी वरील कामांचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करणे तसेच तांत्रिक मान्यता घेणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 28/05/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 18

विषय – नगरपरिषद हद्दीतील विविध योजनेअंतर्गत हाती घेण्यात आलेल्या विकास कामास मुदतवाढ देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 23/05/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

नगरपरिषद हद्दीतील विविध योजनेअंतर्गत हाती घेण्यात आलेली विकास कामे काही तांत्रिक अडचणीमुळे अपुर्ण राहिलेली आहेत. तरी सदर कामांची मुदत संपलेली असून हाती घेण्यात आलेली कामे पुर्ण करणे गरजेचे आहे,तरी सदर विकास कामांना मुदतवाढ घेणे आवश्यक आहे.

विकास कामांची योजना व नावे खालीलप्रमाणे,

**योजनेचे नाव - लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना –**

1. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 09 फुलेनगर येथे अंतर्गत बोळे कॉंक्रिटीकरण व आर.सी.सी. गटर करणे.
2. नगरपरिषद हददीतील घोडके गल्ली येथील अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण पेव्हिंग ब्लॉक बसविणे व आर.सी.सी. गटर करणे.
3. विटा नगरपरिषद घुमटमाळ येथील बाळू चौगुले घर ते सखूबाई चव्हाण घरापर्यंत रस्ता ट्रिमिक्स कॉंक्रिटीकरण करणे व आर.सी.सी. गटर करणे. (प्रभाग क्र. 05)
4. विटा नगरपरिषद हदृदीतील घुमटमाळ येथील नगरपरिषद रस्ता ते तानाजी चौगुले घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.
5. विटा नगरपरिषद हद्दीतील लेंगरे रोड येथे सौंदर्या बिल्डींग ते जुना वासुंबे रोड मोहन भिंगारदेवे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण व आर.सी.सी. गटर करणे.
6. विटा नगरपरिषद हद्दीतील नेहरुनगर येथील अंतर्गत बोळे कॉंक्रिटीकरण करणे. (प्रभाग क्र. 5)
7. विटा नगरपरिषद हद्दीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर येथे महादेव साबळे घर ते संजय कांबळे घरापर्यंत बंदिस्त गटर करणे व रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. (प्रभाग क्र. 11)

**योजनेचे नाव – महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजना –**

1. विटा नगरपरिषद हद्दीतील सोनारगल्ली बोअरिंग ते गोविंद कचरे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.
2. विटा नगरपरिषद हद्दीतील जूना वासुंबे रोड येथील अतुल म्हेत्रे घर ते ब्रह्मदेव बाबर घर ते अशोक जाधव घरापर्यंत आर.सी.सी. गटर व कॉंक्रिटीकरण करणे.

पान नं.2 वर

**योजनेचे नाव – विकास शुल्क (जिल्हास्तर) योजना –**

1. विटा नगरपरिषद हद्दीतील येथील सराफ पेठ ते गणेश पेठ रस्ता डांबरीकरण करणे.

तरी वरील विकास कामांना दिनाकं 31/08/2025 अखेर मुदतवाढ देणेत येत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 28/05/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 19

विषय – विटा नगरपरिषदेकडील फिरते शौचालयांची दुरूस्ती करणेबाबत दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 23/05/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेकडील फिरते शौचालयांची दुरूस्ती करणेबाबत खालील निविदा दाखल आहेत

1) आय स्मार्ट टेक्नो सोल्युशन्स
2) जे.के.इंजिनिअरींग ॲण्ड सप्लायर्स
3) अनंत एन्टरप्रायजेस

उपरोक्त निविदापैकी आय स्मार्ट टेक्नो सोल्युशन्स यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 28/05/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 20

विषय – नगरपरिषद मालकीची अहिल्यादेवी होळकर शॉपिंग सेंटरमधील गाळयाची अनामत रक्कम परत मिळणेबाबत श्री. कन्हैया नामदेव चोथे यांचे दिनांक 20/03/2024 व दिनांक 30/09/2024 रोजीचे दाखल अर्जावर निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी मिळकत व्यवस्थापक यांची दिनांक 26/05/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) श्री. कन्हैया नामदेव चोथे यांचा आवक क्रमांक 9212, दिनांक 20/03/2024 रोजीचा अर्ज

3) श्री. कन्हैया नामदेव चोथे यांचा आवक क्रमांक 4059, दिनांक 30/09/2024 रोजीचा अर्ज

श्री. कन्हैया नामदेव चोथे यांनी या कार्यालयाकडे संदर्भ क्रं.2 व 3 नुसार अर्ज सादर करून सि.स.नं.7,8 मधील नगरपरिषद मालकीच्या अहिल्यादेवी होळकर शॉपिंग सेंटरमधील गाळयाची अनामत रक्कम परत करणेबाबत मागणी अर्ज केलेला आहे. त्यानुसार या कार्यालयाकडील संबंधित व्यक्तीकडून येणे असलेले रक्कम रू. पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | मिळकत नं. | गाळा भाडे | घरपट्टी | पाणी पट्टी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 160415 / 3001540 | 47808 | 43652 | - | - |
| 2 | 1000761 / 523 | 190325 | 129653 | - | - |
| 3 | 480 / 10000313 | - | 19926 | 13500 | - |
| एकूण | - | 238133 | 193231 | 13500 | 444864 |

संबंधिताची या कार्यालयाकडून सि.स.नं. 7,8 मधील नगरपरिषद मालकीची अहिल्यादेवी होळकर शॉपिंग सेंटर गाळयाची अनामत रक्कम रु.2,59,000 देणे बाकी आहे. तरी रक्कम रु. 4,44,864 मधून रक्कम रु.2,59,000 वजा करून उर्वरित रक्कम संबंधिताकडून भरून घेणे. तसेच रक्कम रु. 2,59,000 चा धनादेश तयार करून नगरपरिषदेचे येणे असलेले भाडे व कर नगरपरिषद फंडात जमा करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा